**ठळक बातम्या**

- नौदल दिवसानिमित्त राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून नौदलातल्या जवानांना शुभेच्छा/ मुंबईत विशेष कार्यक्रमाचं आयोजन

- तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आज भारताच्या दौऱ्यावर

- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार

**आणि**

- नंदुरबार जिल्ह्यात सारंगखेडा यात्रेला सुरुवात, घोड्यांच्या खरेदीविक्रीसाठी चेतक महोत्सवाचं आयोजन

**<><><><><>**

आज देशात नौदल दिवस साजरा होत आहे. समुद्री सीमा सुरक्षित ठेवण्यापासून ते समुद्रातल्या आव्हानात्मक परिस्थितीत जीवित बचाव मोहिमा राबवण्यापर्यंत, भारतीय नौदल आपल्या सामर्थ्याचं आणि राष्ट्रीय अभिमानाचं प्रतीक म्हणून खंबीरपणे उभं आहे. **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू** यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात भारतीय नौदलाच्या कार्याची प्रशंसा केली. नौदलातील शिस्त, करुणा आणि जबाबदारी या गुणांचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं. तसंच भारतीय नौदल राष्ट्राच्या सुरक्षेसह जागतिक पातळीवरही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात नमूद केलं. भारतीय नौदल देशाच्या सामुद्री शक्ती, सतर्कता आणि राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे मूर्तिमंत प्रतिक आहे, अशा भावना **उपराष्ट्रपती राधाकृष्णन** यांनी व्यक्त केल्या. आयएनएस विक्रांत या युद्ध नौकेवरील तैनात असलेले जवान आणि अधिकाऱ्यांसोबत साजरी केलेली दिवाळी अत्यंत संस्मरणीय होती, असं **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. **संरक्षण मंत्री राजनाथ सिंह** यांनीही नौदल दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. हिंद महासागरातील सर्वात मोठी नौदल शक्ती म्हणून भारतीय

नौदल शौर्य, सजगता आणि आत्मनिर्भरतेच्या भावनेने देशाच्या सागरी हितांचे संरक्षण करत असल्याचं सिंह यांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे. **केंद्रीय गृहमंत्री अमित शहा** यांनीही नौदल दिनानिमित्त जवानांना आणि अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबईत नेव्हल डॉकयार्ड इथं नौदल दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी नौदलाच्या पश्चिम विभागाच्या कार्मिक विभागाचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल राहुल गोखले यांनी नेव्हल डॉकयार्ड इथल्या गौरव स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

देशाची इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातली उलाढाल २०३० पर्यंत २० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचेल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. येत्या ५ वर्षात ५ कोटींहून अधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता या उद्योगात असल्याचं त्यांनी सांगितलं.

केंद्र सरकारने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष योजनेअंतर्गत देशभरातल्या आदिवासी गावांच्या विकासासाठी ८० हजार कोटी रुपये राखीव ठेवले आहेत, अशी माहिती आदिवासी व्यवहार मंत्री जुएल ओराम यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. आरोग्य, शिक्षण तसंच वीजपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी ६३ हजारांहून जास्त गावांमधे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, असं जुएल ओराम यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

पुणे-नाशिक दरम्यानचा सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग खोडद जवळून न नेण्याचा निर्णय रेल्वे मंत्रालयानं घेतला आहे. खोडद इथं असलेल्या विशालकाय दुर्बिणीच्या कामकाजात या रेल्वेमुळं अडथळा येऊ शकतो, असा अहवाल अणूऊर्जा मंत्रालयानं दिला आहे. त्यामुळं हा रेल्वेमार्ग इथून न नेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात काल दिली.

**<><><><><>**

तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आज भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दोन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, पुतिन उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करतील. दोन्ही नेते परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करतील. व्यापार, अर्थव्यवस्था, आरोग्यसेवा, शैक्षणिक, संस्कृती आणि माध्यमांशी संबंधित अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूही पुतीन यांची भेट घेणार असून त्यांच्या सन्मानार्थ मेजवानीचे आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

अर्थव्यवस्थेसंदर्भातली जागतिक स्तरावरची मानांकन संस्था फिचनं चालू आर्थिक वर्षात भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला असून तो पूर्वीच्या ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांच्या अंदाजापेक्षा अधिक आहे. अलीकडेच केलेल्या कर सुधारणेमुळे ही वाढ होईल असंही फिचनं म्हटलं आहे. खाजगी ग्राहकांकडून करण्यात येणारा खर्च आणि वस्तू आणि सेवाकरातल्या सुधारणांमुळे हे शक्य होणार आहे. पुढच्या आर्थिक वर्षात जीडीपीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के होणार असून डॉलरच्या तुलनेत रुपयाही प्रतिडॉलर ८७ रुपयांचा आसपास राहण्याचा अंदाजही फिचनं वर्तवला आहे.

<><><><><>

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. महाडीबीटी पोर्टल शेतकऱ्यांना ही मदत तत्काळ मिळणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. पूर्वी ऑफलाइन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. याअंतर्गत चालू आर्थिक वर्षात ४ हजार ३५९ लाभार्थ्यांना ८८ कोटी १९ लाख रुपयांचं वाटप झालं आहे.

शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना या योजनेतून अनुदान दिलं जातं. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जाते.

ऑनलाईन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घरुनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येईल. पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगिनवर जाईल. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास ती दुरुस्त करण्यासाठी संबंधित शेतकरी किंवा वारसदारांना मोबाईलवर एसएमएसद्वारे सूचना मिळणार आहेत. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देईल. त्यानंतर मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

**<><><><>**

राज्यातल्या अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त आदिवासी जिल्ह्यांमध्ये कार्यरत मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवासमावेशाचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य भवनातल्या बैठकीत काल ते बोलत होते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नवसंजीवनी योजनेअंतर्गत १९९५पासून राज्यात मानसेवी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. या पदावर १० वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना या अंतर्गत सरकारी सेवेत सामावून घेतलं जाईल.

**<><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर चैत्यभूमीवर अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांना सेवा-सुविधा देण्याकरता बृहन्मुंबई महानगरपालिका सज्ज झाली आहे.

चैत्यभूमी, शिवाजी पार्क, 'राजगृह' यासह आवश्यक त्या विविध ठिकाणी अनुयायांसाठी निवारा, प्रसाधनगृहं, सुरक्षा, आरोग्य आदी बाबींची चोख व्यवस्था केली आहे. या सोयीसुविधांच्या पूर्ततेसाठी सुमारे ८ हजारांहून जास्त अधिकारी-कर्मचारी तैनात असून, चैत्यभूमीतल्या आदरांजलीचं मोठ्या पडद्यांवर, तसंच महानगरपालिकेच्या विविध समाजमाध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

**<><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत येणाऱ्या अनुयायांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेनं ४ डिसेंबर ते १२ डिसेंबर या काळात १५ अनारक्षित विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर ते मुंबई, कलबुर्गी ते मुंबई, अमरावती ते मुंबई आणि कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर या विशेष गाड्या धावणार आहेत. मध्य रेल्वे कल्याण ते परळ मार्गावरही १२ अतिरीक्त रेल्वेगाड्या चालवणार असल्याचं मध्य रेल्वेनं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

दत्तजयंतीच्या निमित्तानं नंदुरबार जिल्ह्यातल्या प्रसिद्ध सारंगखेडा इथल्या एकमुखी दत्तमंदिरात आज भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली आहे. सारंगखेड्यातलं हे दत्तमंदिर महाराष्ट्र, गुजरातसह मध्यप्रदेशातील भाविकांचं श्रद्धास्थान आहे.

दत्तजयंतीचं औचित्य साधत सारंगखेडा इथं दरवर्षी मोठ्या यात्रोत्सवाचं आयोजन केलं जातं. या यात्रोत्सवात घोडे बाजारासोबतच शेती आणि गृहोपयोगी साहित्याचा मोठा बाजार भरतो. याठिकाणच्या घोडे बाजाराला चालना देण्यासाठी इथं चेतक उत्सवाचं आयोजन गेल्या काही वर्षांपासून केलं जात आहे.

<><><><><>

मुंबईतल्या नेहरू विज्ञान केंद्रात काल आणि आज विज्ञान महोत्सव सुरू आहे. यात विद्यार्थी, संशोधक आणि इतर नागरिक सहभागी झाले आहेत. अणूऊर्जेसंदर्भात व्याख्यान, प्रश्नोत्तरे, विज्ञानविषयक चित्रपट, विज्ञानावर आधारित नाटकं यासारखे विविध उपक्रम यात राबविले जात आहेत.

//<><><><><>//